## Shri Sai Temple Construction Policy

**श्रीसाई मंदिर निर्माण धोरण** – श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रचार व प्रसारासाठी श्रीसाई संस्थानकडून देशभर श्रीसाई मंदिर उभारणीचे विचाराधीन आहे. याकरीता एखाद्या संस्थेने किंवा राज्य सरकारने पाच एकर जागा उपलब्ध करून दिल्यास तेथे श्रीसाई संस्थान शिर्डीसारखेच मंदिर उभारणार आहे. याशिवाय तेथे रुग्णालय, अन्नदान आदी उपक्रम राबवले जाणार आहेत. याशिवाय गावोगावी नव्याने उभारण्यात येणाऱ्या श्री साईबाबांच्या मंदिरांचे बांधकामासाठी पन्नास टक्के रक्कम अथवा ५० लाखापेक्षा जी रक्कम कमी आहे ती रक्कम मदत करण्याचा श्रीसाई संस्थान विचार करत आहे.

**Shri Sai Temple Construction Policy –** Shri Saibaba Sansthan is considering construction of Shri Saibaba Temples all over the country to promote and spread the teachings of Shri Saibaba. If an organization or the state government provides five acres of land for this purpose, Shri Saibaba Sansthan will build a temple similar to Shirdi. Activities such as hospitals, food donations, etc. will be implemented there. Additionally, for the construction of new Shri Saibaba Temples in various villages, the organization is contemplating contributing fifty per cent of the cost of construction or Rs.50 lakh rupees whichever is less.

## Donar`s Privilege Policy

**डोनेशन धोरण** - यापुढे भाविक ज्या प्रमाणात देणगी देतील, त्याप्रमाणात त्यांना वर्षभर ठराविक दिवशी आरती व दर्शनाची सुविधा संस्थानकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी श्रीसाई संस्थान युनिक आयडी कार्ड बनवणार आहे. यापूर्वी श्रीसाई समाधीवर शाल पांघरण्यासाठी सोडत पद्धत अवलंबिण्यात येत होती. आता यातही मोठ्या देणगीदारांना ही संधी उपलब्ध करून देण्याबाबत श्रीसाई संस्थानने प्राथमिक प्रस्ताव तयार केलेला आहे.

**Donation Policy -** In the future, the devotee donors will be provided the facility of aarti and darshan on certain days throughout the year according to the amount they donate. For this, Shri Saibaba Sansthan is going to make a unique ID card. Earlier, the lucky draw method was used to cover the Shri Saibaba Samadhi with a shawl. Now Shri Saibaba Sansthan has prepared a preliminary proposal to provide this opportunity to big donors. Suggestions are called from devotees in the draft policy.

## Shri Saibaba Temple Association Policy

**श्रीसाई मंदिर असोसिएशन धोरण-** जगभरातील व देशभरातील श्रीसाई मंदिरांची असोसिएशन स्थापन करण्याबाबतही श्रीसाई संस्थानचा विचार सुरू आहे.

**Shri Saibaba Temple Association Policy-** The idea of establishing associations for Shri Sai Temples worldwide and nationwide is also being considered by Shri Sai Sansthan. Suggestions called from all existing Sai temples all over world

**विषय :- श्री साईबाबा संस्थानमार्फत तसेच साईभक्तांच्या सहभागातून देशभरात श्री साईबाबांची नवीन मंदिरे उभारणे व मंदिरे उभारणीसाठी अनुदान देणेबाबत...**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद :-**

१) अधिनियमाचे कलम १७ (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम १७(२) (ठ) मध्ये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील, तसेच (ड) मध्ये श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल, अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

३) अधिनियमाचे कलम २१ (१)(ख) अन्वये, रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी व पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) कलम २१(१)(ग) अन्वये, "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे".

५) कलम २१(१)(ड) अन्वये, "श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे".

**प्रस्तावना :-**

श्री साईबाबा मंदिर आज जगभरातील लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असल्याने त्यास विश्वमंदिराचे स्वरुप प्राप्त झालेले आहे. श्री साईबाबांनी दिलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या संदेशास वर्तमानकाळात विशेष महत्व प्राप्त झाले आहे. असे थोर संत श्री साईबाबा हे शिर्डी येथे मंगळवार दि.१५ ऑक्टोबर, १९१८ या दिवशी पंचतत्वात विलीन झाले. तद्नंतर साईभक्तांनी बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यास आरंभ केला.

श्री साईबाबा संस्थानमार्फत दि.०१.१०.२०१७ ते दि.१८.१०.२०१८ अखेर श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मोठया प्रमाणावर धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांबरोबरच देशाच्या विविध शहरांमध्ये पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. तसेच शताब्दी सोहळ्यामध्ये कार्यक्रमांचे आयोजनाबाबत देश-विदेशातील साई मंदिरांचे

अधिकारी/ पदाधिकारी यांच्या  सूचना वजा प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी शिर्डी येथे दि.११.१२.२०१६ रोजी व दि.२३.१२.२०१७ रोजी जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

आता, संस्थान अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने संपूर्ण देशभरात श्री साईबाबांची नवीन मंदिरे उभारणेबाबत चर्चा झाली आहे. श्री साईबाबांचे देश-विदेशात कोट्यावधींच्या संख्येने भक्तगण असून असंख्य साई मंदिरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन व प्रशासन तेथील भक्तगणांमार्फत पाहिले जाते.

**अ) <u>श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबांची नवीन मंदिरे उभारणीबाबत</u> :-**

श्री साईबाबा संस्थानमार्फत देशभरात नवीन श्री साईबाबांची मंदिरे उभारावयाची झाल्यास खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

१) श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबांची मंदिरे उभारणीसाठी देशातील विविध राज्ये, शहरे, गांव यांची निश्चिती करणे. सदर मंदिरामध्ये धार्मिक रुढी-परंपरेनुसार पूजा-अर्चा, उत्सव, समारंभ साजरे करण्यास प्रोत्साहन देणे व त्याद्वारे श्री साईबाबांची महती व प्रचार-प्रसार होण्यास मदत होईल.

२) श्री साईबाबांची मंदिरे उभारणीसाठी साईभक्तांकडून देणगी स्वरुपात जमीन किंवा राज्य शासनाकडून मोफत जमीन मिळाल्यास मंदिर उभारणी करता येईल, यासाठी सर्व खर्च संस्थानमार्फत करता येईल.

३) श्री साईबाबांची नवीन मंदिरे उभारणीसाठी Construction of Sai Temples नांवाने निधी उभारुन, विहीत नियमावलीद्वारे त्यासाठी देणगी देण्यासाठी भक्तांना आवाहन करता येईल.

४) श्री साईबाबा संस्थानमार्फत मंदिर उभारणीसाठी शहराची लोकसंख्या, जागेचे  निकष, विहीत मंजु-या, जागेचे आकारमान, मंदिर बांधकामाचा आराखडा, नोंदणी इ. बाबत कार्यवाही करता येईल.

५) लोकसंख्येचा विचार करुन देशाच्या ज्या भागामध्ये श्री साईबाबांची मंदिरे नाहीत, अशा ठिकाणी मंदिर उभारणीसाठी प्राधान्य देणे. ज्या भक्तांना शिर्डी येथे दर्शनासाठी येण्यास अडचणी येतात, त्यांना त्याच ठिकाणी दर्शन करणे सोईचे होईल.

६) साई मंदिरे उभारणीसाठी शहराची निश्चिती झाल्यानंतर कार्यगटाची स्थापना करुन त्या ठिकाणच्या जागेचे सर्वेक्षण करुन अहवाल सादर करणे.

७) साई मंदिरे उभारणीसाठी अंदाजपत्रकीय तरतुद करणे.

८) साई मंदिरे उभारणी बरोबरच मंदिर परिसरात अन्नछत्र चालविणे, मंगल कार्यालय, रुग्णालय, शाळा इत्यादी बांधणे, तसेच सामाजिक उपक्रम राबविणे.

९) श्री साईबाबांचे मंदिर व्यवस्थापन मुख्य कार्यालय शिर्डी यांचेमार्फत नियंत्रित केले जाईल.

१०) श्री साईबाबांचे मंदिर निर्माण करण्यासाठी संस्थानमार्फत तांत्रिक समिती गठीत करण्यात येईल.

११) सदर मंदिर व्यवस्थापनाच्या माध्यमातून तेथील देणगी, दैनंदिन पूजा-अर्चा इ. चे कामकाज पाहणे. मंदिरास प्राप्त होणा-या देणग्या  व वस्तुंबाबत नियमावली तयार केली जाईल.

१२) सदर मंदिर व्यवस्थापनासाठी नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची नियमावली व अधिकार निश्चित करणे. सद्यस्थितीत, सामान्य प्रशासन विभागामार्फत कामकाज केले जाईल.

१३) श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथे स्वतंत्र विभागाची निर्मिती करुन साईभक्तांकडून प्राप्त झालेली देणगी रक्कम, सोने-चांदी, मौल्यवान जड-जवाहीर, परकीय चलन,इतर वस्तू इ. यावर संपूर्ण नियंत्रण ठेवण्यात येईल.

१४) सदर विभागाचे इतर विभागांप्रमाणे जमा-खर्चाचे वेळोवेळी तसेच दरवर्षी लेखापरिक्षण केले जाऊन अहवाल श्री साईबाबा संस्थानला सादर करणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

**ब) श्री साईभक्तांच्या सहभागातून देशभरात श्री साईबाबांची नवीन मंदिरे उभारणे व मंदिरे उभारणीसाठी अनुदान देणेबाबत :-**

श्री साईभक्तांच्या सहभागातून देशभरात श्री साईबाबांची नवीन मंदिरे उभारावयाची झाल्यास खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

१) श्री साईबाबांची मंदिरे उभारणीसाठी देशातील विविध राज्ये, शहरे, गांव येथे साई मंदिर उभारणीस साईभक्तांची मागणी असेल, सदर मंदिरामध्ये धार्मिक रुढी-परंपरेनुसार पूजा-अर्चा, उत्सव, समारंभ साजरे करण्यास प्रोत्साहन देणे व त्याद्वारे श्री साईबाबांची महती व प्रचार-प्रसार होण्यास मदत होईल.

२) अनुदान मागणी झाल्यानंतर अधिकृत ट्रस्ट असणे आवश्यक राहील. तसेच ज्या ट्रस्टचे लेखापरिक्षण होत असेल, अशा प्रस्तावांचा विचार केला जाईल.

३) साई मंदिरे उभारणीसाठी अनुदान देणेकामी नियमावली तयार करुन विहीत नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येतील.

४) शहराची लोकसंख्या, जागेचे निकष, विहीत मंजु-या, जागेचे आकारमान, मंदिर बांधकामाचा आराखडा, नोंदणी इ. बाबींचा उल्लेख करण्यात येईल.

५) साई मंदिर उभारणीसाठी प्राप्त प्रस्तावांबाबत तांत्रिक समिती गठीत करण्यात येईल.

६) लोकसंख्येचा विचार करुन देशाच्या ज्या भागामध्ये श्री साईबाबांची मंदिरे नाहीत, अशा ठिकाणी मंदिर उभारणीसाठी प्राधान्य देणे. ज्या भक्तांना शिर्डी येथे दर्शनासाठी येण्यास अडचणी येतात, त्यांना त्याच ठिकाणी दर्शन करणे सोईचे होईल.

७) साई मंदिर उभारणीसाठी जागेची उपलब्धता पाहून साईभक्तांस अनुदान देणे व सदर अनुदानाची मर्यादा निश्चित करणे. सदर अनुदानाची मर्यादा ही श्री साईबाबा संस्थानकडून ५०% किंवा जास्तीत जास्त रु.५० लाख व साईभक्तांच्या सहभागातून ५०% अशी राहील. यापैकी जे कमी असेल ते अनुदान देणे.

८) मंदिर उभारणीसाठी जागा निश्चित झाल्यानंतर अंतिमतः निवड झालेल्या ट्रस्ट यांचेशी करार करुन नोंदणी करण्यात येईल. त्यांना मंदिर उभारणीसाठी अनुदानाची रक्कम अदा केली जाईल. मंदिर बांधून पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा दाखला देणे बंधनकारक राहील.

९) श्री साईबाबा संस्थान, शिर्डी च्या धर्तीवर साईभक्तांकडून प्राप्त झालेली देणगी रक्कम, सोने-चांदी, मौल्यवान जड-जवाहीर, परकीय चलन, इतर वस्तू व जमा-खर्च इ. चे वेळोवेळी प्रचलीत कायद्यानुसार वार्षिक लेखापरिक्षण करुन अहवाल संस्थानला सादर करणे बंधनकारक राहील.

(पी. शिवा शंकर, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**विषय :- देणगीदार साईभक्तांना द्यावयाच्या सुधारीत सेवा-सुविधांबाबत...**

**प्रस्तावना-** श्री क्षेत्र शिर्डी येथे, श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातुन दररोज हजारो साईभक्त शिर्डीत येत असतात. अशाप्रकारे जगाच्या कानाकोप-यातुन येणा-या साईभक्तांची दिवसेंदिवस शिर्डीमध्ये मोठया प्रमाणात गर्दी वाढत आहे. श्रींचे यथोचित दर्शन झाल्यानंतर साईभक्तांच्या मनाला मोठया प्रमाणात आत्मिक समाधान लाभते. त्यामुळे साईभक्तांना जणुकाही मनातील सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण झाल्याचा प्रत्यय शिर्डीत आल्यावर मिळतो. श्रींचे दर्शन झाल्यानंतर साईभक्त हे आनंदी आणि प्रसन्न मुद्रेने मंदिरातून बाहेर पडल्यावर, आपणही श्री साईबाबांना काहीतरी यथोचित देणगी स्वरुपात (रोख रक्कम/ चेक/ डीडी, परकीय चलन, मौल्यवान वस्तु, सोने-चांदी, विविध रंगांची वस्त्रे वगैरे) अर्पण करावी, अशी प्रत्येक साईभक्ताची मनोमन भावना असते. त्यामुळे श्रींना मनोभावे दक्षिणा अर्पण करण्यासाठी श्री साईभक्त संस्थानचे देणगी काऊंटरवर जाऊन आपआपल्यापरीने यथाशक्ती देणगी देत असतात.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

१) **निर्णय क्र.८७२/दि.३०.११.२०१६ अन्वये,** "रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची / वस्तु साहित्याची देणगी देणा-या साईभक्तास २० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या श्री साई पादुका तसेच साईचरित्र ग्रंथ व एक श्री डी फोटो प्रसादरुपाने देण्यात यावा," असे ठरले आहे.

२) **निर्णय क्र.५१५/दि.२२.०८.२०१८ अन्वये,** ''श्रींना अर्पण होणारी ०१ मीटर पर्यन्तच्या लांबीची वस्त्रे श्री साईभक्तांना मोफत देण्यात यावी. एक लाख व त्यापेक्षा जास्त रक्कम देणगी देणा-या साईभक्तांना मोठया आकाराचे वस्त्र भेट म्हणुन देण्यात यावे." असे ठरले आहे.

त्यास अनुसरुन संस्थानमार्फत सध्या देणगी काऊंटरवर रक्कम रु.२५,०००/- व त्यापेक्षा अधिक रकमेची, रोख स्वरुपात अथवा चेक/डीडी, परकीय चलन, सोने- चांदीच्या वस्तु अथवा मौल्यवान माणिक मोती, खडे व इतर वस्तुरुपाने देणगी देणा-या साईभक्तांना सेवा-सुविधा देण्यात येत आहेत.

तद्नंतर, दि.०९.०६.२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सध्या देण्यात येत असलेल्या सेवा-सुविधा व प्रस्तावित सेवा-सुविधांबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ३४९ अन्वये, खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

३) **निर्णय क्र.३४९/दि.०९.०६.२०२० अन्वये**, "यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे रकमेनिहाय साईभक्तांना सेवासुविधा पुरविणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. तथापि, रक्कम रु.५०,००१/- ते रु.२,००,०००/- पर्यंत देणगी देणा-या साईभक्तांना श्रींचे फोटो ऐवजी श्रींची छोटी मुर्ती देण्यात यावी. नवीन शालची खरेदी कदापीही करु नये, तसेच खर्चात बचत करणेकामी साईभक्तांकडून देणगी स्वरुपात मिळणा-या शाल यांचा वापर करण्यात यावा, असे ठरले. प्रस्तुत प्रकरणी व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८७२ व दि.२२.०८.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१५ निरस्त करण्यास मान्यता देण्यात आली. सदर बाब मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन करुन निदर्शनास आणून द्यावी, असे ठरले."

त्यास अनुसरुन, याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आले होते. तथापि, दरम्यानच्या कालावधीमध्ये मा.उच्च न्यायालय यांचेकडून मा.व्यवस्थापन समितीची नेमणूक करण्यात आली होती. त्यास अनुसरुन मा.उच्च न्यायालयाकडे दाखल असलेले सर्व सिव्हील ॲप्लीकेशन मा.उच्च न्यायालयाने मा.व्यवस्थापन समितीचे स्तरावर निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी, असे निर्देश देऊन परत पाठविले. परंतु मा.व्यवस्थापन समितीची नेमणूक करतांना सदर समितीस मोठया आर्थिक बाबी संबंधीत निर्णय घेता येणार नाही, अशी अट घातल्याने सदर प्रस्तावावर कार्यवाही झालेली नाही.

देणगीदार साईभक्तांना सध्या देण्यात येत असलेल्या सेवा-सुविधांमध्ये वाढ केल्यास, देणगीदार साईभक्तांना निश्चितच समाधान वाटेल आणि पर्यायाने संस्थानच्या उत्पन्नातही भरीव वाढ होईल, असे नम्र मत आहे. **देणगीदार साईभक्तांना द्यावयाच्या सुधारीत सेवा-सुविधांची माहिती सोबत परिशिष्ठ क्र.१ मध्ये नमुद केलेली आहे.**

साईभक्तांना सेवा-सुविधा देतांना खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबविणे आवश्यक राहील.

१) साईभक्तांनी चेकद्वारे देणगी दिल्यास, चेक वटल्यानंतरच साईभक्तांना सेवा-सुविधांचा लाभ देता येईल.

२) देणगीदार साईभक्तांनी ऑनलाईनद्वारे देणगी दिल्यास, देणगी पावती सादर केल्यानंतरच उपरोक्तप्रमाणे सेवा-सुविधांचा लाभ देता येईल.

३) साईभक्त/कंपनी/फर्म/संस्था वगैरे हे संस्थानला विनामोबदला सेवा देत असतील तर सेवेच्या मुल्यानुसार सेवा-सुविधांचा लाभ देता येईल.

४) संस्थानमार्फत देणगीदार साईभक्तांना देण्यात येणा-या सेवा-सुविधांचा लाभ घेण्याकरीता देणगीदार साईभक्त स्वतः उपस्थित असणे आवश्यक राहील.

५) देणगीदार साईभक्तांनी आरती/दर्शन/निवासव्यवस्था सुविधेचा लाभ घेणेसाठी संस्थानला किमान १ महिना अगोदर कळविणे आवश्यक राहील.

६) संयुक्त देणगीदार (Joint Donor) साईभक्तांकरिता देणगी पावतीमध्ये देणगीदारासह एकुण दोन व्यक्तिंचा समावेश राहील. यामध्ये, पती, पत्नी, मुले, मुली यापैकी एकाचा समावेश करता येईल. देणगीदार साईभक्तास दरवर्षी नांव बदलता येणार.

७) जर देणगीदार साईभक्त काही कारणास्तव आरती/दर्शन/निवासव्यवस्था सेवा-सुविधेचा लाभ घेण्यासाठी येऊ शकणार नसेल तर त्यांनी संस्थानला ४८ तास अगोदर तसे कळविणे आवश्यक राहील.

८) एकाच साईभक्ताने एका वर्षात एकापेक्षा जास्त वेळा देणगी दिल्यास, या सर्व देणगी रकमेची एकत्रित देणगी रक्कम विचारात घेऊन त्याला उपरोक्त तक्त्यातील नमुद देणगी रकमेनिहाय असलेल्या सेवा-सुविधांचा लाभ देता येईल.

९) CSR (Corporate Social Responsibility) सदर फंडातून देणगी देणा-या संस्थांसाठी अलाहिदा वेगळी पॉलिसी तयार करण्यात येईल.

सोबतच्या परिशिष्ठ क्र.१ मध्ये नमुद केलेनुसार देणगी रक्कमेनिहाय श्री साईभक्तांना संस्थानकडुन प्रस्तावित केल्यानुसार सेवा-सुविधा दिल्यास, संस्थानचे उत्पन्नात वाढ होण्यास त्याचा निश्चितच फायदा होणार आहे.

त्याअनुषंगाने, मागील तीन आर्थिक वर्षात (सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३) श्रींचे मंदिर व मंदिर परिसरात देणगी काऊंटरवर प्रत्यक्ष येऊन देणगी दिलेल्या साईभक्तांबाबत माहिती तंत्रज्ञान विभागाकडुन मिळालेली साईभक्तांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | देणगी रक्कम | देणगीदार साईभक्तांची संख्या | | | एकुण (२+३+४) | सरासरी (५÷३) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सन २०२०-२१ | सन २०२१-२२ | सन २०२२-२३ | | |
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ०१ | रु.१/- ते रु.१०००/- | ७,०७,९६१ | १०,०६,५७६ | १८,८७,०५१ | ३६,०१,५८८ | १२,००,५२९ |
| ०२ | रु.१००१/- ते रु.१०,०००/- | ७४,१२८ | १,०८,४४० | ३,२९,७१६ | ५,१२,२८४ | १,७०,७६१ |
| ०३ | रु.१०,००१/- ते रु.२५,०००/- | ६,०२० | १०,६३६ | १९,५५८ | ३६,२१४ | १२,०७१ |
| ०४ | रु.२५,००१/- ते रु.५०,०००/- | १,६७१ | ३,३१३ | ६,७७९ | ११,७६३ | ३,९२१ |
| ०५ | रु.५०,००१/- ते रु.२,००,०००/- | १,१४७ | २,३३३ | ५,३६१ | ८,८४१ | २,९४७ |
| ०६ | रु.२,००,००१/- ते रु.५ लाख | ८८ | १४४ | ३१४ | ५४६ | १८२ |
| ०७ | रु.५,००,००१/- ते रु.१० लाख | २१ | ३० | ५४ | १०५ | ३५ |
| ०८ | रु.१०,००,००१/- व त्यापुढील | ३६ | २१ | ४० | ९७ | ३२ |
| | **एकुण :-** | **७,९१,०७२** | **११,३१,४९३** | **२२,४८,८७३** | **४१,७१,४३८** | **१३,९०,४७८** |

**विभागाचा अभिप्राय-** येथुनपुढे, मंदिर व मंदिर परिसरात देणगी काऊंटरवर प्रत्यक्ष येवुन रोख रक्कम, चेक/डीडी, परकिय चलन, सोने-चांदीच्या वस्तु, मौल्यवान माणिक मोती/खडे, तसेच वस्तुरुपाने देणगी देणा-या देणगीदार साईभक्तांना सोबतचे परिशिष्ठ क्र.१ मध्ये नमुद केलेप्रमाणे सेवा-सुविधा दिल्यास, त्याचे संस्थानला खालीलप्रमाणे फायदे होतील.

१) श्री साईभक्त संतुष्ट/समाधानी होऊन, त्यांच्या मनात संस्थानविषयी निश्चीतच समाधानाची भावना निर्माण होईल.

२) श्री साईभक्तांमार्फत देश-विदेशात श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार होण्यास निश्चितच मदत होईल. संस्थानकडुन मिळालेल्या विविध सेवा सुविधांमुळे साईभक्त समाधानी होवुन त्यांना पुन्हा पुन्हा शिर्डीत दर्शनास यावे, असे वाटेल.

३) पर्यायाने संस्थानचे उत्पन्नात देखील मोठया प्रमाणात वाढ होईल, असे मत आहे.

**प्रस्ताव -** सोबतच्या परिशिष्ठ क्र.१ मध्ये नमुद केलेनुसार रकमेनिहाय देणगीदार साईभक्तांना सेवा-सुविधा पुरविणे सुरु करावयाचे झाल्यास, संस्थानकडे असलेल्या वस्त्रांच्या साठयाच्या उपलब्धतेनुसार देणगीदार साईभक्तांना वस्त्रे देण्यास, तसेच श्री साईचरित्र ग्रंथ, श्रीडी फोटोज व इतर फोटोज प्रकाशने विभागाकडुन वेळोवेळी घेणेस, आणि देणगीदार साईभक्तांना देण्यात येणा-या सप्रेम भेट वस्तु करिता माहिती तंत्रज्ञान विभागाकडुन सॉफ्टवेअरमध्ये तशी सुधारणा करुन घेणेस, तसेच प्रस्तावातील उपरोल्लिखीत कार्यपध्दतीसाठी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच,

**देणगीदार साईभक्तांकरीता करावयाच्या कार्यवाहीबाबत :-**

**१) लेखाशाखा विभाग :-**

(१) देणगीदार साईभक्तांकडून विहीत नमुन्यातील फॉर्म भरुन घेऊन सदर भक्ताचे पॅन कार्ड घेऊन देणगी रकमेची पावती व त्यासोबत प्रस्तावात निश्चित केलेनुसार उदी प्रसाद देऊन देणगीदार साईभक्तास जनसंपर्क कार्यालयापर्यंत पोहोच करणे.

(२) देणगीदार साईभक्तांस परिशिष्ठ क्र.१ मध्ये नमुद वस्त्र सप्रेम भेट देणे.

(३) सदर देणगी रक्कम व वस्त्रांच्या जमा-खर्चाच्या नोंदी लेखापुस्तकामध्ये घेणे.

**२) जनसंपर्क कार्यालय :-**

(१) देणगीदार साईभक्तांची दर्शन/आरती ची व्यवस्था करणे.

(२) देणगीदार साईभक्तांसाठी आरती/दर्शन/निवासव्यवस्थेचा कोटा जनसंपर्क विभागामार्फत निश्चित करणे.

**३) प्रकाशने विभाग :-** देणगीदार साईभक्तांकडून देणगीची पावती घेऊन ती तपासून त्यांना श्री साईचरित्र ग्रंथ (भाषेनुसार) व श्री साईबाबांचा फोटो देणे.

**४) प्रसादालय विभाग :-** देणगीदार साईभक्तांची देणगी पावती तपासून घेऊन त्यांची व्हीआयपी कक्षात प्रसाद भोजनाची व्यवस्था करणे.

**५) निवासस्थाने विभाग :-** देणगीदार साईभक्तांची देणगी पावती तपासून घेऊन उपरोक्त तक्त्यात नमुद केलेनुसार त्यांची निवासव्यवस्था करणे.

**६) लाडू प्रसाद निर्मिती विभाग :-** देणगीदार साईभक्तांची देणगी पावती तपासून घेऊन त्यांना परिशिष्ठ क्र.१ मध्ये नमुद केलेनुसार लाडू पाकीटे देणे.

**७) माहिती तंत्रज्ञान विभाग :-**

(१) माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत संकेतस्थळावर देणगीदार साईभक्तांसाठी आरती/दर्शन/निवासव्यवस्था सुविधेसंबंधी कोटा व प्रतिक्षा यादी प्रदर्शित करणे.

(२) देणगीदार साईभक्तांना देण्यात येणा-या सप्रेम भेट वस्तुंकरिता सॉफ्टवेअरमध्ये त्याप्रमाणे दुरुस्ती करुन घ्यावी. जेणेकरुन सॉफ्टवेअरच्या रिपोर्टनुसार देणगीदार साईभक्तांना देण्यात आलेल्या सप्रेम भेट वस्तुंच्या स्वतंत्र जमा-खर्चाच्या नोंदी दर माहिन्याला ठेवता येतील.

तरी देणगीदार साईभक्तांना द्यावयाच्या सुधारीत सेवा-सुविधांबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

(पी. शिवा शंकर, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# परिशिष्ठ क्र.१ - देणगीदार साईभक्तांना द्यावयाच्या सुधारीत सेवा-सुविधांचा तपशिल

| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.नं. | देणगी रक्कम | उदी प्रसाद पाकीटे (१ नगाचे) | लाडू प्रसाद पाकीटे (१ नगाचे) | श्रीसाईबाबांचा श्रीडी फोटो / श्रीसाईबाबांची मोठी मुर्ती | दर्शन | आरती | श्री साईचरित्र ग्रंथ (भाषेनुसार) | श्रींना अर्पण केलेले वस्त्र / श्रींना चढविलेली शाल | व्हीआयपी कक्षात प्रसादभोजन | सोने/चांदी नाणी एक वेळेस | श्रींचे आरतीकरीता वस्त्र चढविणे व आरतीकरीता खांबाचे पुढे उभे करणे |
| १ | रु.१ ते १००/- | २ पाकीटे | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २ | रु.१०१/- ते रु.१,०००/- | २ पाकीटे | १ पाकीट | पॉकेट साईज | - | - | - | - | - | - | - |
| ३ | रु.१,००१/- ते रु.१०,०००/- | २ पाकीटे | २ पाकीटे | १ श्रीडी फोटो (२.५"x३.५") | २ भक्तांना १ वेळ दर्शन | - | - | - | - | - | - |
| ४ | रु.१०,००१/- ते रु.२५,०००/- | ४ पाकीटे | ४ पाकीटे | १ श्रीडी फोटो (२.५"x३.५") | ५ भक्तांना २ वेळ दर्शन | - | - | - | ५ भक्तांना २ वेळ | - | - |
| ५ | रु.२५,००१/- ते रु.५०,०००/- | ५ पाकीटे | ५ पाकीटे | १ श्रीडी फोटो (२.५"x३.५") | ५ भक्तांना २ वेळ दर्शन | वर्षातून ५ भक्तांना १ वेळ आरती (काकडआरती वगळता तसेच गुरुवार, शनिवार, रविवार व उत्सव कालावधी वगळता) | श्री साईचरित्र ग्रंथ १ | श्रींना अर्पण केलेले १ वस्त्र | ५ भक्तांना २ वेळ | - | - |
| ६ | रु.५०,००१/- ते रु.१,००,०००/- | १० पाकीटे | १० पाकीटे | श्री साईबाबांचा १ श्रीडी फोटो स्टॅण्डी फोटो (५"x७") | ५ भक्तांना ३ वेळ दर्शन | वर्षातून ५ भक्तांना २ वेळ आरती (काकड आरती वगळता तसेच गुरुवार, शनिवार, रविवार व उत्सव कालावधी वगळता) | श्री साईचरित्र ग्रंथ १ | श्रींना अर्पण केलेले १ वस्त्र | ५ भक्तांना ३ वेळ | | |

| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.नं.** | **देणगी रक्कम** | **उदी प्रसाद पाकीटे (१ नगाचे)** | **लाडू प्रसाद पाकीटे (१ नगाचे)** | **श्रीसाईबाबांचा श्रीडी फोटो / श्रीसाईबाबांची मोठी मुर्ती** | **दर्शन** | **आरती** | **श्री साईचरित्र ग्रंथ (भाषेनुसार)** | **श्रींना अर्पण केलेले वस्र / श्रींना चढविलेली शाल** | **व्हीआयपी कक्षात प्रसादभोजन** | **सोने/चांदी नाणी एक वेळेस** | **श्रींचे आरतीकरीता वस्र चढविणे व आरतीकरीता खांबाचे पुढे उभे करणे** |
| ७ | **रु.१,००,००१/- ते रु.२,५०,०००/-** | १० पाकीटे | १० पाकीटे | १ श्रीडी फ्रेम असलेला फोटो (५"x७") | वर्षातून ५ भक्तांना ४ वेळ दर्शन | वर्षातून ५ भक्तांना ३ वेळ आरती (गुरुवार, शनिवार, रविवार व उत्सव कालावधी वगळता) | श्री साईचरित्र ग्रंथ १ | श्रींना चढविलेली १ शाल | ५ भक्तांना ४ वेळ | चांदी नाणी - १ (२० ग्रॅम) (उपलब्धतेनुसार) | देणगीदार साईभक्ताने १ महिना आगाऊ कळविल्यास, गुरुवार, शनिवार, रविवार व उत्सव कालावधी वगळता, वर्षातून १ वेळेस संस्थान नियमानुसार श्रींचे आरतीकरीता वस्र चढविता येईल. |
| ८ | **रु.२,५०,००१/- ते रु.५,००,०००/-** | १५ पाकीटे | १५ पाकीटे | १ श्रीडी फ्रेम असलेला फोटो (८"x११") | वर्षातून ५ भक्तांना ५ वेळ दर्शन | वर्षातून ५ भक्तांना ३ वेळ आरती (गुरुवार व उत्सव कालावधी वगळता) | श्री साईचरित्र ग्रंथ १ | श्रींना चढविलेली १ शाल | ५ भक्तांना ५ वेळ | चांदी नाणी - २ (२० ग्रॅम) (उपलब्धतेनुसार) | देणगीदार साईभक्ताने १ महिना आगाऊ कळविल्यास, गुरुवार, शनिवार व उत्सव कालावधी वगळता, वर्षातून २ वेळेस संस्थान नियमा- नुसार श्रींचे आरती करीता वस्र चढविता येईल व वर्षातून १ वेळेस श्रींचे आरतीसाठी ५ भक्तांना खांबाच्या पुढे उभे करणेत येईल |
| ९ | **रु.५,००,००१/- ते रु.१०,००,०००/-** | २० पाकीटे | २० पाकीटे | १ श्रीडी फ्रेम असलेला फोटो (८"x११") व श्री साईबाबांची १ मोठी मुर्ती | वर्षातून १० भक्तांना ६ वेळ दर्शन | वर्षातून १० भक्तांना ३ वेळ आरती (गुरुवार व उत्सव कालावधी वगळता) | श्री साईचरित्र ग्रंथ १ | श्रींना चढविलेली १ शाल | १० भक्तांना ६ वेळ | चांदी नाणी - ३ (२० ग्रॅम) (उपलब्धतेनुसार) | देणगीदार साईभक्ताने १ महिना आगाऊ कळविल्यास, गुरुवार व उत्सव कालावधी वगळता, वर्षातून ३ वेळेस संस्थान नियमानुसार श्रींचे आरतीकरीता वस्र चढविता येईल व वर्षातून २ वेळेस श्रींचे आरतीसाठी ५ भक्तांना खांबाच्या पुढे उभे करण्यात येईल. |

| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.नं.** | **देणगी रक्कम** | **उदी प्रसाद पाकीटे (१ नगाचे)** | **लाडू प्रसाद पाकीटे (१ नगाचे)** | **श्रीसाईबाबांचा श्रीडी फोटो / श्रीसाईबाबांची मोठी मुर्ती** | **दर्शन** | **आरती** | **श्री साईचरित्र ग्रंथ (भाषेनुसार)** | **श्रींना अर्पण केलेले वस्र / श्रींना चढविलेली शाल** | **व्हीआयपी कक्षात प्रसादभोजन** | **सोने/चांदी नाणी एक वेळेस** | **श्रींचे आरतीकरीता वस्र चढविणे व आरतीकरीता खांबाचे पुढे उभे करणे** |
| **१०** | **रु.१०,००,००१/- ते रु.५०,००,०००/-** | २५ पाकीटे | २५ पाकीटे | १ फ्रेम असलेला श्रीडी फोटो (८"x११") व श्री साईबाबांची १ मोठी मुर्ती | वर्षातून १० भक्तांना १५ वेळ दर्शन | वर्षातून १० भक्तांना ५ वेळ आरती (उत्सव कालावधी वगळता) | श्री साईचरित्र ग्रंथ १ | श्रींना चढविलेली १ शाल | १० भक्तांना १५ वेळ | सोने नाणी - १ (५ ग्रॅम) व चांदी नाणी - १ (२० गॅम) (उपलब्धतेनुसार) | देणगीदार साईभक्ताने १ महिना आगाऊ कळविल्यास, वर्षातून ४ वेळेस संस्थान नियमानुसार श्रींचे आरतीकरीता वस्र चढविता येईल व वर्षातून ४ वेळेस श्रींचे आरतीसाठी ५ भक्तांना खांबाच्या पुढे उभे करण्यात येईल. (पैकी उत्सव कालावधीत फक्त एकदा) |
| **११** | | २५ पाकीटे | २५ पाकीटे | १ फ्रेम असलेला श्रीडी फोटो (८"x११") व श्री साईबाबांची १ मोठी मुर्ती | वर्षातून १५ भक्तांना १५ वेळ दर्शन | वर्षातून १५ भक्तांना ६ वेळ आरती (उत्सव कालावधी वगळता) | श्री साईचरित्र ग्रंथ १ | श्रींना चढविलेली १ शाल | १५ भक्तांना १५ वेळ | सोने नाणी - २ (५ ग्रॅम) व चांदी नाणी - १ (२० गॅम) (उपलब्धतेनुसार) | देणगीदार साईभक्ताने १ महिना आगाऊ कळविल्यास, वर्षातून ५ वेळेस संस्थान नियमानुसार श्रींचे आरतीकरीता वस्र चढविता येईल व वर्षातून ५ वेळेस श्रींचे आरतीसाठी ५ भक्तांना खांबाच्या पुढे उभे करण्यात येईल. (पैकी उत्सव कालावधीत फक्त एकदा) |

(पी. शिवा शंकर, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# Annexure 1 - Uniform Privileges for Donors

| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Donation Amount** | **Udi Prasad Packets** | **Laddu Prasad Packets** | **Shri Saibaba 3D Photo / Idol** | **Darshan** | **Aarti** | **Shri Saicharitra Book (Language wise)** | **Cloth Offered to Shri Saibaba** | **Prasad Bhojan in the Prasadalaya VIP Section** | **Gold / Silver Coins (One Time)** | **Offering Cloths for Shri Saibaba's Arati and standing before the pillar in the temple for Arti** |
| **1** | **Rs.1 to 100** | 2 Packets | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **2** | **Rs.101 to 1,000** | 2 Packets | 1 Packets | 1- 3D Photo (Pocket Size) | - | - | - | - | - | - | - |
| **3** | **Rs.1,001 to 10,000** | 2 Packets | 2 Packets | 1 - 3D Photo (2.5"x3.5") | 1 time Darshan for 2 Devotees | - | - | - | - | - | - |
| **4** | **Rs.10,001 to 25,000** | 4 Packets | 4 Packets | 1 - 3D Photo (2.5"x3.5") | 2 times Darshan for 5 Devotees | - | - | - | 2 times for 5 Devotees | - | - |
| **5** | **Rs.25,001 to 50,000** | 5 Packets | 5 Packets | 1 - 3D Photo (2.5"x3.5") | 2 times Darshan for 5 Devotees | 1 time Aarti for 5 Devotees in a year (Except Kakad Aarti and also except Thursday, Saturday, Sunday and Festival period) | 1 - Shri Saicharitra Book | 1- Holy Cloth offered to Shri Saibaba | 2 times for 5 Devotees | - | - |
| **6** | **Rs.50,001 to 1,00,000** | 10 Packets | 10 Packets | 1 - 3D Standy Photo (5."x7") | 3 times Darshan for 5 Devotees | 2 times Aarti for 5 Devotees in a year (Except Kakad Aarti and also except Thursday, Saturday, Sunday and Festival period) | 1 - Shri Saicharitra Book | 1- Holy Cloth offered to Shri Saibaba | 3 times for 5 Devotees | | |

| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Donation Amount** | **Udi Prasad Packets** | **Laddu Prasad Packets** | **Shri Saibaba 3D Photo / Idol** | **Darshan** | **Aarti** | **Shri Saicharitra Book (Language wise)** | **Cloth Offered to Shri Saibaba** | **Prasad Bhojan in the Prasadalaya VIP Section** | **Gold / Silver Coins (One Time)** | **Offering Cloths for Shri Saibaba's Arati and standing before the pillar in the temple for Arti** |
| **7** | **Rs.1,00,001 to 2,50,000** | 10 Packets | 10 Packets | 1 - 3D Framed Photo (5."x7") | 4 times Darshan for 5 Devotees | 3 times Aarti for 5 Devotees in a year for any Aarti (Except Thursday, Saturday, Sunday and Festival period) | 1 - Shri Saicharitra Book | 1- Shri Saibaba's weared Shawl at the time of Aarti | 4 times for 5 Devotees | 1 - Silver Coin (20 Grams) (Subject to Availability) | If the Donor informs 1 month in advance 1 time in a year according to Sansthan Rules, dress can be worn for Shri Saibaba's Aarti. (excluding Thursday, Saturday, Sunday and festival period) |
| **8** | **Rs.2,50,001 to 5,00,000** | 15 Packets | 15 Packets | 1 - 3D Framed Photo (8"x11") | 5 times Darshan for 5 Devotees | 3 times Aarti for 5 Devotees in a year (Except Thursday and Festival period) | 1 - Shri Saicharitra Book | 1- Shri Saibaba's weared Shawl at the time of Aarti | 5 times for 5 Devotees | 2 - Silver Coin (20 Grams) (Subject to Availability) | If the Donor informs 1 month in advance 2 times in a year according to Sansthan Rules, dress can be worn for Shri Saibaba's Aarti. (excluding Thursday, Saturday and festival period)<br>And 5 devotees will be made to stand in front of the pillar in temple during the Aarti once a year |
| **9** | **Rs.5,00,001 to 10,00,000** | 20 Packets | 20 Packets | 1 - 3D Framed Photo (8"x11") And 1 - Big Idol of Shri Saibaba | 6 times Darshan for 10 Devotees | 3 times Aarti for 10 Devotees in a year (Except Thursday and Festival period) | 1 - Shri Saicharitra Book | 1- Shri Saibaba's weared Shawl at the time of Aarti | 6 times for 10 Devotees | 3 - Silver Coin (20 Grams) (Subject to Availability) | If the Donor informs 1 month in advance 3 times in a year according to Sansthan Rules, dress can be worn for Shri Saibaba's Aarti. (excluding Thursday and festival period)<br>And 7 devotees will be made to stand in front of the pillar in temple during the Aarti once a year |

| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Donation Amount** | **Udi Prasad Packets** | **Laddu Prasad Packets** | **Shri Saibaba 3D Photo / Idol** | **Darshan** | **Aarti** | **Shri Saicharitra Book (Language wise)** | **Cloth Offered to Shri Saibaba** | **Prasad Bhojan in the Prasadalaya VIP Section** | **Gold / Silver Coins (One Time)** | **Offering Cloths for Shri Saibaba's Arati and standing before the pillar in the temple for Arti** |
| **10** | **Rs.10,00,001 to 50,00,000** | 25 Packets | 25 Packets | 1 - 3D Framed Photo (8"x11") And 1 - Big Idol of Shri Saibaba | 15 times Darshan for 10 Devotees | 5 times Aarti for 10 Devotees in a year (Except Festival period) | 1 - Shri Saicharitra Book | 1- Shri Saibaba's weared Shawl at the time of Aarti | 15 times for 10 Devotees | 1 - Gold Coin (5 Grams) & 1 - Silver Coin (20 Grams) (Subject to Availability) | If the Donor informs 1 month in advance 4 times in a year according to Sansthan Rules, dress can be worn for Shri Saibaba's Aarti. And 5 devotees will be made to stand in front of the pillar in temple during the Aarti once a year. (Only once during the festival period) |
| **11** | **Rs.50,00,001 And beyond that for Donor Sai Devotees** | 25 packets | 25 Packets | 1 - 3D Framed Photo (8"x11") And 1 - Big Idol of Shri Saibaba | 15 times Darshan for 15 Devotees | 6 times Aarti for 15 Devotees in a year (Except Festival period) | 1 - Shri Saicharitra Book | 1- Shri Saibaba's weared Shawl at the time of Aarti | 15 times for 15 Devotees | 2 - Gold Coin (5 Grams) & 1 - Silver Coin (20 Grams) (Subject to Availability) | If the Donor informs 1 month in advance 5 times in a year according to Sansthan Rules, dress can be worn for Shri Saibaba's Aarti. And 5 devotees will be made to stand in front of the pillar in temple during the Aarti once a year. (Only once during the festival period) |

(P. Siva Sankar, IAS)
**Chief Executive Officer**
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi